




# वास्तुदोष निवारणार्थ

● कुठल्याही नवीन वास्तूत प्रवेश करताना वास्तुशांती करणे आवश्यक आहे. सोसायटी उभारताना बिल्डरने पूजा केली असेल, तरीही पुन्हा आपल्या फ्लॅटमध्ये पूजा करणे जरुरीचे आहे.

● नवीन घरात प्रवेश करताना कलश पूजन जरुर करावे.

● रामरक्षास्तोत्र, हनुमान चालीसाचे वाचन तसेच कुलदेवीची उपासना घरात करणे आवश्यक आहे.

● दररोज सुर्योदय किंवा सुर्यास्ताच्या वेळेस अग्निहोत्र केल्यास घरातील वातावरण पवित्र होते व मन प्रसन्न रहाते.

● जेवण करण्यापूर्वी कावळ्याला कावघास जरुर द्यावा.

● रोज सकाळी स्नान करून देवाची पूजा करणे आवश्यक आहे. तसेच संध्याकाळीही दिवा लावून देवाची आरती व उपासना करावी.

● सकाळ-संध्याकाळ देवाजवळ शुध्द तुपाचा दिवा व सुगंधित अगरबत्ती लावावी.

● तिन्हीसांजेच्या वेळेस घरात धूप जाळावा त्यामुळे घरात वाईट शक्ती प्रवेश करीत नाही तसेच घरातील डास पण बाहेर पळतात.

● सकाळ, संध्याकाळ घरात गायत्री मंत्र, ॐनमः शिवाय, चांगले श्लोक किंवा मंत्र ह्यांच्या कॅसेट जरूर लावाव्या. त्यामुळे घरातील वातावरण पवित्र बनते.

● घरामध्ये श्रीयंत्राची स्थापना करून दररोज श्रीसूक्ताचे कमीत कमी एक आवर्तन तरी करावे.

● अमावस्येच्या दिवशी दही व नारळ घरावरुन उतरवून बाहेर फेकून द्यावे.

● वर्षातून किमान दोन वेळेस होम, हवन, यज्ञ जरुर करावे.

● ज्यांना जमेल त्यांनी वर्षातून एकदा तरी नवचंडी यज्ञ करावा.

● घराच्या मुख्य दरवाज्यावर लक्ष्मी, गणपती यांचे फोटो लावावे तसेच स्वस्तिक, ओम यांचे चिन्ह लावावे.

● प्रवेशद्वारासमोर झाडू, फुटकी कुंडी, तुटक्या चपला कधीही ठेवू नये.

● अग्नेय स्वयंपाकघराच्या खिडकीत तुळस जरुर लावावी. तुळस ही मांगल्य व पवित्रतेचे प्रतिक आहे. तसेच तुळशीमध्ये आरोग्यदायक व रोगनिवारक शक्ती आहे त्याचप्रमाणे तुळशीमुळे घरातील डासही कमी होतात.

● वास्तूच्या आतील व बाहेरील भागामधील जाळे जळमटे वरचेवर काढून टाकावीत. तसेच घरात विनाकारण कुठलीही अडगळ साठवून ठेवू नये. अन्यथा मानसिक त्रास होतो, कामे लांबणीवर पडतात. पैशाची चणचण भासते.

● ज्यांच्या घराला अंगण असेल त्यांनी प्रवेशद्वारासमोर रोज सडा टाकावा, रांगोळी काढावी, तुळशी पूजन करावे. अशाने सौभाग्य वाढते. मन प्रसन्न व आनंदी राहते.

● घराला वर्ष - दोन वर्षांनी रंगरंगोटी करावी. रंग उडालेल्या भिंतीमुळे माणसाच्या जीवनात नैराश्य येते.

● घरात तुटक्या - फुटक्या, पिचलेल्या वस्तू ठेवू नये. विनाकारण जुनाट वस्तूंमध्ये जीव गुंतवू नये.

● आपले घर नेहमी झाडून पुसून लख्ख करावे म्हणजे लक्ष्मीला देखील आपल्या घरात रहायला आवडते.

● घरात विनाकारण कुणाची चुगली निंदा करु नये. विनाकारण रडू नये. उगाच कशाची चिंता करु नये कारण जसे आपण आपल्या अंतर्मनाला सूचना देतो तसेच आपल्याला फळ मिळते.

● घरातील ईशान्य कोपरा हा नेहमी सर्वात स्वच्छ व मोकळा ठेवावा.

● देवघरात मोजकेच देव ठेवावे. अन्यथा देवघराची सफाई करणे जड जाते. देवघराकडे बघितल्यास मनाला प्रसन्न वाटणे आवश्यक आहे.

● देवघरात व मुख्य दरवाज्यासमोर बेडरुममध्ये मृत व्यक्तींचे फोटो लावू नये.

● महिलांनी स्वयंपाक करताना नेहमी पूर्व दिशेकडे तोंड करून स्वयंपाक करावा.

● त्याचप्रमाणे मुलांनी अभ्यास करताना, देवपूजा करताना, ध्यानधारणा करताना तसेच जेवताना आपण सगळ्यांनी पूर्व, उत्तर किंवा ईशान्य दिशेस तोंड करावे.

● वास्तुशांती पूजन चांगल्या योग्य पुरोहितांकडूनच करुन घ्यावे व वास्तुपुरुषाची प्रतिमा वास्तूमध्ये अग्नेय दिशेस जमिनीतच ठेवावे. देव्हाऱ्यात अथवा भिंतीत मुळीच ठेवू नये.

● वर्षातून एकदा तरी कुलदेवतेचे दर्शन घ्यावे अथवा उत्सव करणे अत्यावश्यक आहे.